पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/६४/१५
पुणे १ दिनांक :- २८/०१/२०१५

प्रति,

मा.आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

विषय :- नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत …

संदर्भ :- १) सचिव, युरो स्कूल एज्युकेशन ट्रस्ट ,संचलित युरो स्कूल , वाकड सर्वे नं १७८/५,१८७/७,१८७/६/२ पिंपरी चिंचवड ,पुणे
सन २०१४-१५ स्वयं अर्थसहाय्यीत मान्यता प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयांस अनुसरुन सादर करण्यात येते की, युरो स्कूल एज्युकेशन ट्रस्ट ,संचलित युरो स्कूल , वाकड सर्वे नं १७८/५,१८७/७,१८७/६/२ पिंपरी चिंचवड ,पुणे ही शाळा सन २०१४/१५ .मध्ये स्वयंअर्थसहाय्यीत योजने खाली पात्र झालेली आहे.बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ अन्वये मान्यता प्रमाणपत्रासाठी आय.सी.एस.ई. या बोर्डाशी संलग्नित, युरो स्कूल एज्युकेशन ट्रस्ट ,संचलित युरो स्कूल , वाकड सर्वे नं १७८/५,१८७/७,१८७/६/२ पिंपरी चिंचवड ,पुणे या शाळेचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदर शाळेचा प्रस्ताव मान्यता प्रमाणपत्र जोडून पुढील कार्यवाहीस्तव आपल्या कार्यालयास सादर करण्यात येत आहेत. कृपया स्विकार व्हावा ही विनंती.

आपला विश्वासू

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

<u>स्वयंअर्थसाहाय्यित तत्वावर</u>

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/६३ /१५
पुणे १ दिनांक :- २८/०१/२०१५

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
युरो स्कूल एज्युकेशन ट्रस्ट ,संचलित
युरो स्कूल ,वाकड सर्वे नं १७८/५,१८७/७,१८७/६/२
पिंपरी चिंचवड ,पुणे

<u>विषय:-</u> सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

<u>संदर्भ:-</u> १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. २४) दि.२ जुलै २०१४.

२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२, दि.२६फेब्रुवारी २०१४

३)मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/ स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/२०१४/११३७५/ ७८ दि.१७ मे २०१४

४) मा.शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश क्र.अमाशा/स्वयंअर्थ/ २०१३/ १५-क (५) १०८४२ दि.२० नोव्हेंबर २०१३

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तींवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | सुरु असलेल्या वर्गासहीत | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | २८५ | युरो स्कूल ,एज्युकेशन ट्रस्ट ,मुंबई | युरो स्कूल ,वाकड ,पिंपरी चिचवड ,पुणे | इंग्रजी | इ. १ ली ते ६ वी | जून २०१४ पासून | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च ~~प्राथमिक~~ प्राथमिक, ICSE(NOC) |

<u>अटी व शर्ती</u>

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०४ अन्वये सन २०१४-१५ मध्ये सुरु असलेल्या वर्गासह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
4. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.

स्वयंअर्थसहायित तत्त्वावर

(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/५७८४/२०१७**
**पुणे १ दिनांक:- ३१/०५/२०१७**

प्रति,

मुख्याध्यापिका,
युरो स्कूल वाकड,पिंपरी चिंचवड, जि.पुणे,

**विषय:-** स्वयंअर्थसहायित तत्त्वावर तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना **नैसर्गिक वाढीचा** इयत्ता ७ वी ते इयत्ता ८ वी वर्गास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा ( स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/११३७५/७८ दि. १७ मे २०१४.

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीचा वर्ग सन २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | युरो स्कूल वाकड,पिंपरी चिंचवड, जि.पुणे, | इंग्रजी | इयत्ता ७ वी ते इयत्ता ८ वी | २०१४-१५ | स्वयंअर्थसहायित तत्त्वावर |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**सचिव/अध्यक्ष :- युरो स्कूल वाकड,पिंपरी चिंचवड, जि.पुणे,**